Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

WITH AUTHOR'S COMPLIMENTS.

एल्० पी० जैन

यांची

संकेत-लिपि

CHECKED 1973

मराठी शॉर्ट-हॅण्ड

[MARATHI SHORT-HAND]

भाग १ ला

आविष्कारक व प्रकाशक

एल्. पूनमचन्द जैन, ब्यावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओ३म्
पुस्तक संख्या ५६ म/२(क)
पञ्जिका-संख्या....२५२-१

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

२५२४९
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एल्० पी० जैन

ह्यांची

संकेत-लिपि

[सर्व भाषांचें शॉर्ट-हँड]

मराठी भाषेमध्यें

—×—

भाग १

—×—

आविष्कारक व प्रकाशक

एल्. पूनमचन्द जैन, व्यावर

—0—

प्रथमावृत्ति १०००

इ. स. १९४१

मूल्य आठ आणे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

L. P. Jain's "SANKET LIPI."



Rd Seal copy.

Registered at the Registrar's office, Calcutta, vide No. 1600 dated the 5th Oct. 1931, under, Act No. III 1914 & Act No XXV 1867.

COPY RIGHT 1931

(Under Act No. 3 of 1914 and Act No. 25 of 1867.)

'L. P. Jain's Sanket Lipi (Short hand for all languages)' is the exclusive property of L. Poonam Chand Khinvensra, in the British Empire as well as in all countries included in Berne Convention, and it will be an infringement of such copyright if it be reproduced in any manner or form without written permission.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावना

कित्येक वर्षांपासून मला असें वाटत असे कीं, जर सर्व जगांतील लोक एक भाषा बोलतील तर फार चांगलें होईल. ही गोष्ट असंभवनीय असली तरी एक लेखन-प्रणालि निर्माण होण्यांत यश मिळणें शक्य कोटींतील आहे. ह्यांतूनच पुढें मला एक कल्पना सुचली. अशी एक लिपि शोधून काढली पाहिजे कीं जिचे संकेत अगदीं थोडे आणि सोपे असावे. या लिपीच्या फक्त पुस्तकाच्या आधारानें कोणत्याहि देशाचा विद्वान् रहिवासी केवळ तीन महिन्यांत उत्तम यश संपादन करूं शकेल. ह्यासाठीं ह्या लिपीचे संकेत इतके व्यापक असले पाहिजेत कीं कुठल्याहि देशांतील कोणत्याहि भाषेंतील शब्द सुलभतेनें ह्या लिपींत लिहितां आला पाहिजे. ही संकेत-लिपि इतकी संक्षिप्त आणि पूर्ण असली पाहिजे कीं बोलणाऱ्याच्या भाषेचें थोडेंसें ज्ञान असणारा मनुष्यसुद्धां वक्त्याच्या मुखांतून बाहेर पडणारे शब्द ह्या लिपीनुसार जलद उतरून घेऊं शकेल.

ह्या गोष्टी लक्षांत घेऊन अशी एक संकेत-लिपि तयार करावी अशी कल्पना माझ्या डोक्यांत घोळत होती. परंतु तिला प्रत्यक्ष रूप देण्यासाठीं मला मिळावें तसें उत्तेजन मिळालें नाहीं.

ह्या कल्पनेचें रूपांतर प्रत्यक्षांत न येण्यास एक मोठी अडचण होती. प्रत्येक संकेत दुसऱ्या कितीहि संकेतांशीं जोडण्यांत आला तरी त्याचा विशिष्ट आकार कायम राहावा. म्हणजे दोन संकेत एकमेकांत मिळाल्यावरहि तिसऱ्या संकेताचा भ्रम उत्पन्न होऊं नये. कारण माझी इच्छा अशी होती कीं, प्रत्येक शब्द किंवा वाक्य अंकित करण्यांत लेखणीचा उपयोग शक्य तितका टाळावा. ह्याप्रमाणें निरनिराळे संकेत जोडण्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दृष्टीनें मला पुष्कळ अडचणी आल्या. संकेत-लिपीस व्यवस्थित स्वरूप प्राप्त होण्यास विलंब होणें हीच अडचण मुख्यतः कारणीभूत झाली.

ह्या अडचणींचा विचार करीत असतांना, श्री. जैनाचार्य पूज्यवरमुनि, पं. जवाहरलाल महाराज ह्यांचीं स्फूर्तिदायक भाषणें ऐकिलीं तेव्हां माझी ही सुप्त भावना जागृत झाली आणि प्रत्येक पुरुष परमपूज्य मुनींच्या उच्च विचारांचें चिंतन आणि मनन करूं शकेल असा प्रयत्न करण्याची माझ्या मनाला स्फूर्ति झाली.

देशांतील प्रसिद्ध पुढारी पं. मदनमोहन मालवीय वगैरे विद्वानांनीं ह्या पूज्य मुनिवरांच्या भाषणांची मुक्त कंठानें स्तुति केली आहे. असेंहि ऐकिवांत आहे कीं, ह्याच पूज्यवरांच्या व्याख्यानांच्या आधारें रचल्या गेलेल्या 'धर्मव्याख्या' ह्या पुस्तकाची जगप्रसिद्ध महात्मा गांधींनीं तारीफ करून त्याचा इंग्रजींत अनुवाद होणें अत्यंत आवश्यक आहे असें प्रकट केलें आहे. तेव्हां अशा महानुभावांच्या अमूल्य उपदेशांचा संग्रह करण्याचा माझ्या मनांत विचार जागृत झाला असल्यास त्यांत आश्चर्य कसलें ? ह्याच उद्देशाच्या पूर्वतेसाठीं संकेत-लिपि पूर्ण करण्याचा मी मनः-पूर्वक प्रयत्न करूं लागलों आणि विशेष आनंदाची गोष्ट कीं, ह्या अडचणी गुरुकृपेनें दूर होऊन ह्या लिपीस व्यावहारिक रूप देणें मला शक्य झालें. त्याच उत्साहाच्या भरानें संकेत-लिपींतील हें प्रथम पुस्तक लिहिण्यास मी प्रेरित झालों.

मनुष्य जेव्हां बोलतो तेव्हां शास्त्रीय दृष्ट्या शब्द म्हणजे आवाज काढतो आणि ह्या शब्दांचे भिन्नभिन्न संकेत बनतात. ह्या संकेतांच्या योगानें भिन्नभिन्न शब्द आणि वाक्यें बनतात. हे संकेत संख्येनें जास्त नसून अगदीं थोडे आहेत. हे संकेत जाणणारा कोणीहि मनुष्य कोणत्याहि भाषेंत बोलत असला तरी त्या शब्दांना लिपिबद्ध करूं शकतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्या पुस्तकांत शब्दांच्या ध्वनींना संकेतबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे आणि कांहीं मर्यादेपर्यंत त्यांत निश्चित सफलता प्राप्त झाली आहे. वरील विवेचनावरून वाचकांनीं जाणलेंच असेल कीं, ही लिपि ध्वनींस लिपिबद्ध करण्याचें एक साधन आहे आणि ह्याचसाठीं हिच्या योगानें कोणत्याहि भाषेंतील ध्वनि लिहितां येतील. परंतु ध्वनींस लिपिबद्ध करण्यानेंच आमचा उद्देश सफल होत नाहीं. साधारणपणें सर्व भाषांतील वर्णमाला ध्वनि-लेखनाचें साधन आहेत. परंतु आम्हांस संकेत-लिपीमध्यें कांहीं विशेषता आणली पाहिजे. संकेत-लिपीचा (शॉर्ट हँडचा) उद्देश हाच आहे कीं, वक्त्याच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या शब्दांना शीघ्रतेनें अंकित करून दुसरा शब्द तोंडांतून निघण्यापूर्वी त्याला अंकित करण्यासाठीं वेळींच तयार व्हावयाचें. ह्यासाठीं थोड्या वेळांत जास्त काम मनुष्याला करावें लागतें. म्हणून चिन्हांना सोपें बनविण्याची अत्यंत जरुरी असते. ज्यायोगें शब्द व वाक्य जलद आणि सरळपणें लिहिलें जातील अशा संकेतांकडे जास्त लक्ष पुरविण्यांत आलें आहे. आम्हांस लिहिण्यास अत्यंत आनंद वाटतो कीं, ह्या संकेत-लिपीची शीघ्रता आणि सरळपणा पाहून ह्या संकेत-लिपीचा विद्वानांनीं, कौन्सिलांनीं, राजे-रजवाड्यांनीं अंगीकार केला आहे. ह्या लिपीच्या व्यावहारिक सरळपणामुळेंच देशांतील भिन्नभिन्न भाषांमधून पुस्तकें प्रकाशित करण्याची जरुरी उत्पन्न झाली आहे. राष्ट्रपुढारी आणि विद्वान् ह्यांनीं दिलेल्या अभिप्रायांवरून ह्या लिपीची योग्यता आपोआप सिद्ध होते.

ह्या लिपींमध्यें शुद्धतेनें लिहिलेले लेख ही लिपि जाणणारा दुसरा विद्वान सुद्धां चांगल्या रीतीनें वाचूं शकतो. दुसऱ्या शॉर्टहँड लिपींमध्यें संकेत बारीक मोठे आणि लहान व लांब, तसेंच रेषेच्या वर-खालीं लिहिण्यानें बरेच फरक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होत असल्यानें शब्दांचा अर्थ भलताच होण्याचा प्रायः संभव असतो. आणि ते संकेत संख्येनें अधिक आणि कठिण असल्यानें ते सर्व लक्षांत ठेवणें अशक्य होऊन जातें. चारसहा महिने त्यांच्या अभ्यासांत खंड पडला कीं, पुन्हां फार परिश्रम करावे लागतात तेव्हांच आपलें कार्य योग्य रीतीनें करण्यास माणूस समर्थ होतो. आणि संकेत-चिन्ह बारीक-मोठें असल्यानें विशेष प्रकारची किंमती झरणी (फाउन्टन-पेन) बाळगण्याची जरुरी भासते. परंतु मीं संकेतांना थोडें व पूर्णपणें सरळ-सोपें बनविण्याचा यथा-शक्ति प्रयत्न केला आहे. त्या योगानें ही लिपि जाणणारा दुसरा मनुष्यहि लिपि-लेखकाच्या लेखांचा अनुवाद सहज करूं शकेल आणि कांहीं कारणानें लिहिण्याचा अभ्यास बंद पडला तरी एका आठवड्याच्या अभ्यासानें पुन्हां तो पहिल्याइतका तयार होऊं शकेल. आणि हे संकेत लिहिण्यास फक्त चांगल्या टोकाची कॉपीइंग पेन्सिल असली तरी पुरे.

वरील सर्व विवेचनावरून वाचकांना समजून आलेंच असेल कीं, ह्या लिपीचा अभ्यास करण्यास विशेष बुद्धीची आवश्यकता नाहीं. एक साधारण शिकलेला विद्यार्थी—म्हणजे मराठी ४ थी इयत्ता उत्तीर्ण झालेला विद्यार्थी—फक्त तीन महिन्यांच्या अवधींत चांगल्या परिश्रमानें ह्या लिपीच्या संकेतांवर चांगल्या प्रकारें आधिपत्य मिळवूं शकतो. आणि शब्द लिहिण्याची गति बाढल्याबर कोणत्याहि वक्त्याच्या मुखांतून निघालेले शब्द एकहि शब्द न गाळतां लिहून घेऊं शकतो.

लिपि कोर्ट कचेऱ्यांतील अधिकाऱ्यांच्या भाषणांची नोंद करण्यास, अध्यापकवर्गाच्या व्याख्यानांची नोंद करण्यास, त्याचप्रमाणें वर्तमानपत्रांच्या बातमीदारवर्गास वेळेची बचत करून यशस्वी रीतीनें आपलें कार्य करण्यास ही संकेत-लिपि अत्यंत फलदायक होईल, असा पुरेपूर विश्वास बाळगण्यास हरकत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही संकेत-लिपि प्रथम १९३१ च्या नोव्हेंबर महिन्यांत एका लहान पॉकेट साइझ पुस्तकाच्या स्वरूपांत हिंदी भाषेंत लिहिली गेली. परंतु तें पुस्तक अत्यंत संक्षिप्त झाल्यानें विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांत फारच अडचण भासूं लागली. म्हणून संकेत-लिपि अतिशय सरळ आणि सुलभ करण्यासाठीं पाठावलींच्या रूपानें तीन भागांत हिंदी भाषेंत प्रसिद्ध करावी लागली. ह्यामुळें हिंदी भाषाभाषी जनतेचा फार फायदा झाला.

दिल्लीच्या हिंदी साहित्य सम्मेलनाचा, त्याचप्रमाणें महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या इंदूर येथील २४ व्या हिंदी साहित्य सम्मेलनाचा संपूर्ण अहवाल ह्या संकेत-लिपीच्या पद्धतीनुसार तयार झालेल्या हिंदी भाषेंतील विद्यार्थ्यांनीं ह्या संकेत-लिपींत घेऊन प्रसिद्धि मिळविली आहे.

ह्यानंतर लेजिस्लेटिव्ह कौन्सिल, इंदूर, सी. पी. आणि बऱ्हाड लेजिस्लेटिव्ह कौन्सिल, नागपूर, सेन्ट्रल ॲडव्हाइसरी बोर्ड, जोधपूर, जयपूर, उदेपूर इत्यादि, त्याचप्रमाणें सभा-सोसायट्यांच्या सभा वगैरेंचे संतोषजनक अहवाल घेऊन ह्या संकेत-लिपीच्या विद्यार्थ्यांनीं प्रसिद्धि आणि प्रशंसा मिळविली आहे. ह्या सरळ आणि सुलभ संकेत-लिपीच्या ह्या प्रसिद्धीनें आकर्षित होऊन शिकूं इच्छिणाऱ्यांची संख्या इतकी वाढली कीं प्रत्यक्ष स्वरूपांत ह्या संकेत-लिपीस शिकविण्यासाठीं जैन वीराश्रम, ब्यावर, ह्या संस्थेमार्फत एक वर्ग सुरू करावा लागला. आणि ता. ११ जून १९३८ ह्या शुभ दिवशीं एक वर्ग उघडण्यांत आला.

सारांश, ह्या शॉर्ट-हँडची दिवसेंदिवस प्रगति होत आहे. कांहीं दिवसांपूर्वी ग्वाल्हेर हायकोर्टातील तीन जागांसाठीं श्रीमान् चीफ जस्टिस जी. के. शिंदे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं हिंदी शॉर्ट-हँड पद्धतीची चढाओढ ता. ६-७-१९३९ रोजीं झाली. तिच्यांत भाग घेण्यासाठीं निरनिराळ्या पद्धतींचा पुरस्कार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करणारे सात उमेदवार आले होते. ह्यांमध्यें काशीहून शिकून आलेले १२५ गतीचे दोन आणि १०५ च्या गतीचा एक होता. ह्या सात उमेदवारांतून आमची संकेत-लिपि शिकलेले तीन उमेदवार (श्री. श्यामनारायण गुप्ता, मौलना महम्मद असगर कुरेशी आणि गणपतराव मोदी) हेच यशस्वी झाले आणि त्यांची तीन जागांवर नेमणूक झाली. इ. स. १९३८च्या जानेवारीच्या अखेरीस अजमीर मेरवाडा राजनैतिक संमेलनाच्या मार्फत शार्ट हँडची चढाओढ झाली. तींत श्रीजैन वीराश्रम, ब्यावर, ह्या संस्थेचे विद्यार्थी प्रेमराज जैन ह्यांनीं प्रत्येक मिनिटास १४० शब्द ह्याप्रमाणें गतीचा उच्चांक स्थापित करून सभापति श्री. भुलाभाई देसाई यांचेकडून सुवर्णपदक मिळविलें.

ह्या संकेत-लिपीची उपयुक्तता समजून आल्यानें अखिल भारतवर्षीय साहित्य सम्मेलनाच्या संपादकीय कलेच्या परीक्षेमध्यें आणि इंग्रजींत लंडन चेम्बर ऑफ कॉमर्सच्या शॉर्ट-हँड परीक्षेमध्यें ह्या लिपीस स्थान मिळालें आहे. त्याचप्रमाणें इंडिअन मर्चंट्स् चेंबर, बॉंबेच्या शॉर्ट-हँडच्या परीक्षे-मध्येंहि ता. २३ नोव्हेंबर १९४० पासून या लिपीस स्थान दिलें आहे. आणि विशेष पत्रव्यवहार केल्यानंतर कोणत्याहि भाषेंतील (इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराथी) शॉर्ट-हँडच्या परीक्षेसाठीं कमींतकमी २० विद्यार्थी मिळाल्यास त्यांचेसाठीं योग्य अशा ठिकाणीं सेंटर दिला जाईल, असेंहि जाहीर करण्यांत आलें आहे. ह्याप्रमाणें संकेत-लिपीची दिवसेंदिवस उन्नति होत आहे.

मराठीप्रेमी जनसमाजसुद्धां हिंदी भाषाभाषींच्या प्रमाणें ह्या पुस्तकाच्या द्वारें संकेत-लिपीचा पूर्ण फायदा करून घेईल अशी मला पूर्ण आशा आहे. मराठी जनसमुदायाकडून ह्या पुस्तकास प्रोत्साहन मिळतांच दुसरा आणि तिसरा भाग लौकरच प्रकाशित करीन.

निवेदक,

एल्. पुनमचंद जैन, ब्यावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १ ला.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ २ रा.

व्यंजनें शिकायाचा सरळ उपाय
किंवा
वेग वेगळ्या सिद्धान्तानुसार बनलेल्या संकेताचे समूह.

समूह १—प, ब

समूह २—क, च, ज

समूह ३—ण, न, म 

समूह ४—ट, ड, त, च 

समूह ५—य, र, ल, स

समूह ६—ग, द, व, ह, ज्ञ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ३ रा.

ओळखण्या साठी व्यंजन संकेत.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ४ था.

मोठ्या उच्चाराचीं व्यंजनें

पहिल्या पाठामध्यें व्यंजनांचे फक्त २१ संकेत दिले आहेत. ह्यांच्याशिवाय मराठीमध्यें आणखी व्यंजनें आहेत, त्यांचा ध्वनि ह्या व्यंजनांच्या उच्चारांशीं मिळणारा असा आहे. फक्त त्यांमध्यें थोडा मोठा उच्चार आहे. ह्यांच्याशीं मिळणाऱ्या कोमल उच्चाराच्या संकेताखालीं एक लहान बिंदु लावला असतां मोठ्या उच्चाराच्या व्यंजनांचे संकेत बनतात. मोठ्या उच्चाराचीं व्यंजनें कोणत्या व्यंजनांपासून कशीं बनतात तें खालीं दाखविलें आहे.

मोठ्या उच्चाराचीं व्यंजनें

क च्या मोठ्या उचारानें	ख बनतो	म्हणून ख = ख़
ग	घ	घ = ग़
च	छ	छ = च़
ज	झ	झ = ज़
ट	ठ	ठ = ट़

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ड	ढ	ढ =
त	थ	थ =
द	ध	ध =
प	फ	फ =
ब	भ	भ =
स	श	श =
श	ष	ष =
ल	ळ	ळ =

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ५ वा.

मराठीच्या व्यंजनांचे एकंदर संकेत.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ६ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

चट	पट	हट
घर	चल	वन
पर	मन	कम
जल	गज	नळ
बळ	कच	भज
नभ	मळ	मग
गम	धन	हर
करं	सम	मत
तंट	नग	दश



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ७ वा.

मराठींत लिहा ।



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ८ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

शरद	कमल	नयन
चरण	सकल	हजर
गमन	कलश	नकल
हरख	चटक	नजर
टपक	सरळ	मकर
कवन	जलद	भरत
शरद	समय	पवन
नरक	शरण	नमन
रदन	परम	पटल



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ९ वा.

मराठींत लिहा ।



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १० वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

चटपट	गणपत	खटपट
मखमल	अवखळ	भगवन्
ठमठम	लटपट	चकमक
हरकत	तनमन	रजकण
सरपट	पटकन्	तळमळ
अटकळ	हरकत	चमचम
मलमल	बडबड	वनचर
खळबळ	हरभट	कटकट
कसरत	तगमग	लडथड

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ११ वा.

मराठींत लिहा ।



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १२ वा

स्वर

संकेत-लिपीमध्यें मूळ स्वर चारच आहेत.

अ	इ	उ	ऋ
⊃	⊂	∪	⊂

ह्याशिवाय जे आणखी स्वर बनतात ते ह्यांच्या साहाय्यानें बनत असल्यानें त्यांना वेगळे स्वर मानणें योग्य नाहीं. कांहीं मात्रांच्या मदतीनें हे स्वर बनूं शकतात.

मराठीचे पूर्ण स्वर खालीलप्रमाणें बनतातः—

अ	आ	ए	ऐ	ओ	औ	अं	अः
⊃	⊃́	⊃̀	⊃̀́	⊃̃	⊃̃́	⊃̀̃	⊃ः

इ	ई	उ	ऊ
⊂	⊂́	∪	∪́

'इ' आणि 'ऋ' ह्यांचे संकेत एक असल्यानें घोटाळा होण्याचा संभव पुष्कळांना वाटेल, परंतु तसें होत नाहीं. कारण 'इ' चा संकेत व्यंजनांच्या संकेतांना जोडला जातो, परंतु 'ऋ'चा संकेत अगदीं पृथक् असून दुसऱ्या संकेतांच्या खालीं लिहिला जातो.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १३ वा.

मात्रा

मराठींतील मात्रांप्रमाणें संकेत-लिपीमध्येंसुद्धां मात्रा आहेत आणि मराठीमध्यें ज्याप्रमाणें मात्रा लाविल्या जातात त्याचप्रमाणें त्या संकेतलिपींत सुद्धां लाविल्या जातात.

मात्रा खालीं दाखविल्याप्रमाणें आहेत :

आ	इ	ई	उ	ऊ	ए	ऐ	ओ	औ	अं	अः
।	∩	∪	⊃	⊂	–	<	⌉	⌐	·	:

मात्रेच्या बरोबर अनुस्वार आला असतां दोन्ही वेगळे लिहिण्याची जरूर नाहीं. अनुस्वार मात्रेच्या बरोबरच लिहावा. परंतु हें पहिलें पुस्तक असल्यानें मात्रा वेगवेगळ्या दाखविल्या जातील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १४ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

राम	नाम	मान	खाना
दास	चरखा	काम	आकाश
कमान	आराम	साधा	नवलाख
चपला	गाथा	खराब	झपाटा

नाना चटपट चल.

रामा काम झटपट कर.

बाबा मला चमचा हवा.

कामास जा. माळा बनव.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १५ वा.

मराठींत लिहा ।



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १६ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

कवि	नाभि	टिळा	मति
गति	पति	रवि	सखि
हरिण	तिरळा	कठिण	शिवाय
मिसळ	खिदळ	पितळ	किरण
किलबिल	शिरताज	चिवचिव	तिरमिर

शिवबा, टिळा लावतां का ?

पक्षिगण किलबिल करितात.

कविराज, आपण कविता करा.

कठिण कामाशिवाय विजय कसला ?



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १७ वा.

मराठींत लिहा ।





CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १८ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

तीळ	पीळ	काळी	माळी
नदी	वीणा	चीन	मीन
इटली	चिमणी	टिकली	मशीन
पालखी	पितळी	कथील	चवरी
लीलावती	विलायती	भारतीय	विपरीत

नदींत कमळीची टिकली पडली.

शिवाजी कधींच हरला नाहीं.

मला मराठी भाषा कठिण वाटली.

नसती चवकशी कशाला करावी ?



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १९ वा.

मराठींत लिहा ।





CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ २० वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

शिशु	मधु	गुरु	दुःख
कुरु	खुशी	पुर	कुली
गुलाब	खुलासा	चुकार	दुनिया
चुगली	सुमन	शकुनी	कुमारी
दुःशासन	फुलवाली	बुधवार	कुलगुरु

जुनी सुपारी नुकसान करिते.

फुलवाडींत गुलाब खुलत असत.

राजकुमारी काल दुपारीं घरून पळाली.

जुलैची तिसरी तारीख गुरुवारीं पडली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ २१ वा.

मराठींत लिहा ।





CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ २२ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

मूळ	खून	मूग	ऊन
सूत	भूस	फूट	जून
टिकाऊ	रूटर	उतारू	जिजाऊ
मूळचा	रूलर	मामूली	लढाऊ
चमकून	यूनान	भरपूर	दूरदूर

दुधांत साखर घालून पी.

विलायती मशीन घेऊन रामू आला.

खुनी माणूस हातांतून निसटून पळाला.

भिकारीण मधून मधून असूं गाळूं लागली.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ २३ वा.

मराठींत लिहा ।





CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ २४ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

एक	शेर	देठ	केला
मेला	पेठ	सेठ	जेल
केशर	चमेली	शेगडी	पटेल
बेशक	बेकार	बेदम	बेकार
पेशावर	रेलगाडी	लेखराम	मलेरिया

रामानें शेगडी पेटविली.

घोडे रेल्वेपुढें निघून गेले.

खेमानें काल पेशावरचे पेढे नेले.

शिवाजीनें मुसलमानी सेनेचा पराभव केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १५ वा.

मराठींत लिहा ।





CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ २६ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

कैरी	पैसा	जैसा	मैना
शैव	जैन	चैत्र	थैला
जैपूर	कैकाडी	वैशाख	वैभव
हैदर	मैदान	सैतान	सैनिक
जैनगुरु	जैतारन	दैनंदिन	जैसलमेर

म्हैसूर वैभवशाली देश आहे.

सैनिकांसमवेत हैदर मैदानांतून पळाला.

वैशाखांतील नदीकांठचें वैभव काय लिहावें !

तैं का दुर्गुण, लोभ जैं; पिशुनता जैं कां महापातकें.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ २७ वा.

मराठींत लिहा ।





CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ २८ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

लोभ	होम	चोर	बोरी
मोरी	होळी	झोली	तोल
ठोकर	तोवरा	खोपट	मोटार
कोमळ	कोठडी	लोचट	चोवीस
टेलीफोन	गोलमेज	मोळीवाला	कोहिनूर

कसोटी कोळशासारखी काळी असते.

मोहननें चोवीस तोळे सोनें खरेदी केलें.

चोर नोटा चोरून मोटारींतून लाहोरला पळाला.

माझे दोघेहि शेजारी होळी जळतांना झोंपले होते.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ १९ वा.

मराठींत लिहा ।















CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ३० वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

औंस	नौका	हौद	सौर
चौथा	फौज	मौन	दौड
चौकट	चितौड	कौपीन	गौशाला
चौवेजी	चौपायी	गौरव	कौशिक
सौदागर	जौनपूर	गौपालक	औटघडी

कौडी कौडी माया जोडी.

हौशी जवान मुलगे दौडत आहेत.

सौदागर फौजेसाठीं नौकेंतून घोडे नेत आहे.

चितौडमधील बायकांनीं जौहर करून आपला गौरव राखला.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ३१ वा.

मराठींत लिहा ।





CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ३२ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

रंग	संग	लंका	गंगा
उंट	उंडा	दंड	अंत
पतंग	तरंग	कंकण	सुगंध
बुंदेल	गोंडस	गोंडल	चंपक
कुंदकळी	निरंजन	पांडेचरी	चंपारण

मंगळवारीं तुरुंगाचे बंध तुटले.

अंगणांतील फांदीला घंटा बांधली होती.

सुंदर जंगल पाहून मनास आनंद वाटला.

पंजाब व बंगाल वगैरे प्रदेशांत चांदीची मंदी आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ३३ वा.

मराठींत लिहा ।





CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ३४ वा

जोडाक्षरें

मराठींत पुष्कळशीं अक्षरें जोडाक्षरें असतात. त्यांमध्यें पहिलें अर्धें व दुसरें संपूर्ण असतें. संकेत-लिपींतहि जें अक्षर अर्धें आहे त्या अक्षराच्याखालीं ^ असें चिन्ह लावावें म्हणजे तें अक्षर अर्धें समजलें जातें. जसें:—

चिन्ह		रम्य	
गर्व		गुप्त	
नग्न		काव्य	

सम संयुक्ताक्षरें

एकाच जातीचीं दोन अक्षरें जोडाक्षरांत जोडलेलीं असलीं तर तीं वेगवेगळीं लिहिण्याचें कारण नाहीं. एकच अक्षराचा संकेत लिहून त्याच्याखालीं v असें चिन्ह लिहिलें असतां त्या अक्षराचें द्वित्व होतें. जसें:—

टक्कर		धिक्कार	
तट्टू		सज्जन	
सुट्टी		भिन्न	



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ३५ वा

लहान-मोठ्या ध्वनींचीं जोडाक्षरें

संयुक्त अक्षरामध्यें पहिलें म्हणजे अर्ध अक्षर लहान आवाजाचें आणि दुसरें पूर्ण अक्षर त्याच मोठ्या आवाजाचें असेल तर लहान आवाजाचें अक्षर लिहून त्याच्याखालीं ८ असें चिन्ह करावें. जसें:—

मट्ठा		तुच्छ	
लट्ठी		चिट्ठी	
पत्थर		उद्धार	
उत्थान		सद्धर्म	



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ३६ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

वाक्य	संख्या	तख्त	वाग्देवी
उच्चार	अच्युत	अंजन	कल्लोळ
राज्य	मध्यम	पब्लिक	सत्कर्म
उत्तम	निंद्य	उद्देश	उद्धार
ध्वनि	न्याय	हास्य	उल्हास
काश्मीर	कऱ्हाड	उष्ण	आल्हाद

उज्जयनीचा राजा दिग्विजयी होता.

सत्यवक्ता मिथ्या वक्तव्य करीत नाहीं.

काश्मीर उत्तम आणि धनाढ्य स्थान आहे.

विद्या भिन्न भिन्न साधनांच्या अभ्यासानें साध्य होते.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ३७ वा.

मराठींत लिहा ।

आई	काका	दादा	पाऊस
मोर	घोडा	पाणी	आकाश
पंखा	खोली	गाडी	चोर
पोपट	चोर	मोटार	झाड
फळा	पेन्सिल	वही	शाई

आपण सर्व मराठी शाळेत जातो.

आमच्या शाळेत पुष्कळ मुले आहेत.

आमचे शिक्षक फार चांगले आहेत.

आम्ही रोज शाळेत जातो.

———*———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ३८ वा

अर्ध रकार आणि 'ऋ' ची मात्रा

ज्या वेळीं र आधीच्या अर्ध्या अक्षराशीं मिळतो तेव्हां तो मराठींत अक्षराच्या खालीं लिहिला जातो. जसें:—वक्र, घ्राण, वज्र इत्यादि. संकेत-लिपीमध्यें सुद्धां ह्या रच्याप्रमाणें लहान चिन्ह उजवीकडे किंवा डावीकडेच्या अर्ध अक्षराच्या संकेताच्या खालीं पृथक् लिहावा लागतो. जसें:—

वक्र		क्रम	
निद्रा		ध्रुव	

रकार ज्या वेळीं अर्धा असतो त्या वेळीं तो संयुक्त अक्षरांच्या नियमांप्रमाणें (पाठ ३४) लिहिला जातो.

ऋच्या मात्रेचें संकेत-लिपीमध्यें ८ असें चिन्ह आहे. हें संकेताच्या खालीं पृथक् लावावें लागतें. कारण त्यामुळें भ्रम उत्पन्न होत नाहीं. जसें:—

पृथ्वी		कृष्ण	
नृप		कृपा	



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ३९ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

खोटें बोलणें पाप आहे.

मातापितरांची आज्ञा माना.

कोणाशींहि लढूं नका.

शिकण्यांत लक्ष घाला.

वाईट संवयी सोडून द्या.

गरीब मुलांस साहाय्य करा.

कुणालाहि त्रास देऊं नका.

आपल्या शत्रूवरहि प्रेम करा.

नेहमीं दुसऱ्यांवर उपकार करा.

क्रोधी माणूस नेहमीं दुःखी असतो.

उद्यां करावयाचें काम आजच करा.

आळशी मनुष्य नेहमीं निर्धन असतात.

दीन, दुःखी, दरिद्री मनुष्यांना प्रत्यहीं मदत करा.

अभिमान करूं नका.

व्यर्थ खर्च करूं नका.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ४० वा.

मराठींत लिहा ।

ბ०ᓴ ᒐ¬ᓀᐩ ᑕ०ᓀ ᑲᓀᑐᑌ ᓀᓭ ᑌᓀ.
ᓀᓭᓄ ᓀᓱ ᓀᑐᓀ ᓀᑲᑐᓀᓴ ᓀბ ᑌᓀ.
ᓀᑎᓀᓀ ᒉ ᓀᑐᓀ ᒉᓴ ᒉ ᑕᓀᓄ ᑌᓀᒉ.
ᓀᑐᓴ ᑕᑐᓀ ᒉᓀᓴᓀᓀ ᓀᓱ ᑌᓀ ᒉ¬ ᑌᒉ.
ᑐ ᓀᓭᒉ ᓀᑐᓴ ¬ᓭᓀ ᓴᓀᓀᒉ ᓀᓀ ᒉᓀᓴ.
ᓀᓀᓴ ᓀo ᑌᓀᓀ¬ ᑕᓀᓀ ᓀᓀᑎ ᒉᓀ ᓀᓀᓀ.
ᓄᒉ ᓀᓀᓀᓀᓀ ᓀᓀᓀᓀ ᑌᓀᓀ ᑌᓀᓀ ᓀᓀᒉ.
ᓀᓀᓀ ᒉ¬ ᓀᓀ ᓄᓀᑌ ᑕᓀᓀᓀᒉ ᓄᓀᑌ ᓀᓀ.
ᓀᓀᓴ ᓀᓀᓀᑌ ᓄᓀᓀ ᓀᓀᑎ ᑕᓀᓀ ᑕᓀᓀ ᓀo ᑕᒉ.
ᓄᓀᑎ ᓀᓀᓀᓀ ᓄᓀᓀ ᓀᑎᓀᓀ ᓀᓀᓀ ᓀᓀᑎ ᑌᓀᓀ.
ᓀᓀᓀ ᓄᓀᓀ¬ ᓄᓀ ᓀᓀᓀ¬ ᑌᓀᓀ ᑕᓀᓀ ᓀᓀ.
ᓀᑌᓀ ᓀᓀᓀᑌ ᓀᓀᓀᓀ ᑌᓀᓀᓀ ᑌᓀᓀ ᓀᓀᓀ ᑌᓀᓀ.
ᓀᑌᓀᓀ ᓄᓀᓀᓀ ᓀᓀᓀᓀ ᑌᓀᓀᓀ ᑌᓀᓀ ᓀᓀᓀ ᑌᓀᓀ.
ᓀᓀᓀᓀ ᓀᓀᓀᓀ ᓀᓀᓀᓀ ᑌᓀᓀᓀ ᑌᓀᓀ ᓀᓀᓀ ᑌᓀᓀ.
ᓀᓀᓀᓀ ᓀᓀᓀᓀ ᓀᓀᓀᓀ ᑌᓀᓀᓀ ᑌᓀᓀ ᓀᓀᓀ ᑌᓀᓀ.

———*———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ४१ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

जो कोणी अकारण क्रोध करतो त्यास नेहमीं दुःख भोगून नुकसान सोसावें लागतें.

असत्य बोलणाऱ्या मुलांवर खरें बोलत असतांहि कोणी भरंवसा ठेवीत नाहीं.

जी गोष्ट स्वतःस आवडत नाहीं तीच दुसऱ्यांच्या संबंधीं वागतांना करणें म्हणजे मूर्खपणा होय.

सज्जन मनुष्य कधींहि दुसऱ्याचा द्वेष करीत नाहीं.

बुद्धि हें सर्व आकस्मिक आक्रमणांपासून संरक्षण करणारें कवच आहे.

बोधप्रद वचनें लक्षपूर्वक श्रवण करा, मग तीं कितीहि थोडीं असोत.

समजदार माणसानें सत्य आणि असत्य ह्यांचा प्रत्येक गोष्टींत निर्णय केला पाहिजे.

पुष्पापरी दो परिचीच साची । हे वृत्ति संभावित जे तयांची ॥
लोकांचिये एक शिरीं सजावें । वनींच कीं एक सुकोनि जावें ॥



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ४१ वा.

मराठींत लिहा ।

कृपा असून पत्राचे उत्तर लवकर पाठविणे.

आपण कोठे जाणार आहां व कधी परत येणार आहां ते लवकर कळविणे.

तुम्ही कोठून आलां आहां.

आम्ही तुमचे आज्ञेवरून येथे आलों आहों. तुमचे आज्ञेप्रमाणे मी सर्व कामे केली आहेत.

आपण कोठे राहतां व आपले नांव काय आहे.

आपण कोठे जाणार आहां व आपले नांव काय आहे.

आपण कोठे राहतां व आपले नांव काय आहे.

आपण कोठे जाणार आहां व आपले नांव काय आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ४३ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

आपत्तींना जे आपत्ति समजत नाहींत ते आपत्तींनाच संकटांत घालून परत पाठवितात.

विद्वान् जेथें जातो तेथें आपल्याबरोबर आनंद घेऊन जातो, परंतु जेव्हां सोडून जातो त्या वेळीं मागें दुःख ठेवून जातो.

जो मनुष्य सावध असतांना कोणाहि नशेबाज माणसाश्री दुर्गति पाहतो तो स्वतः नशा केला असतां आपली कशी स्थिति होत असेल ह्याचा अंदाज बांधूं शकत नाहीं काय ?

मूख माणूस अविचारानें आपल्या अंगावर स्वतः जीं संकटें ओढून घेतो तीं त्याच्या वैऱ्यांनाहि त्याच्यावर आणण्यास अत्यंत प्रयास करावे लागतील.

परीक्षा केल्याखेरीज कुणावरहि विश्वास ठेवूं नका आणि आपल्या माणसांची परीक्षा घेतल्यावर प्रत्येकाला त्याच्या लायखीप्रमाणें काम द्या.

विद्या हें पुरुषास रूप बरवें, कीं झांकलें द्रव्यही ।
विद्या भोग सुकीर्तिदायक पहा ते मान्य मान्यासही ॥
विद्या बंधु अस विदेश-गमनीं विद्या महादेवता ।
विद्या पूज्य नृपास, हा नरपशू ती वेगळा तत्त्वतां ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ४४ वा.

मराठींत लिहा ।

ज्ञानेश्वर हा मोठा संतकवि होऊन गेला. त्याचा जन्म पैठण येथे झाला. त्याचे वडील विठ्ठलपंत हे होते. त्यांनी तीर्थयात्रा केली. त्यांचे नांव रुक्मिणी. ज्ञानेश्वर हा त्यांचा मुलगा होय.

त्याचे शिक्षण फार थोडे झाले. त्याने ज्ञानेश्वरी हा ग्रंथ केला. त्याचा अर्थ सोपा आहे. त्याने हरिपाठ, चांगदेव पासष्टी, अभंग वगैरे ग्रंथ केले.

ज्ञानेश्वर हा मोठा योगी होता. त्याने आळंदी येथे समाधि घेतली. त्याची समाधि अजून आहे. तेथे दरवर्षी यात्रा भरते.

ज्ञानेश्वर व त्याचे भाऊ निवृत्ति, सोपान व मुक्ताबाई यांनी लहानपणी पुष्कळ त्रास सोसला. त्यांचे आईबाप लहानपणीच वारले.

———*———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ४५ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

पृथ्वी, जे तिचें पोट खोदून वस्तु बाहेर काढितात. त्या लोकांनाहि आश्रय देते त्याचप्रमाणें तुम्हीहि आपणांस त्रास देणाऱ्या माणसांचीं कृत्यें सहन करा. कारण त्यांतच मोठेपण आहे.

भाषेंत गोड शब्द असतांनाहि जे पुरूष कडू शब्दांचा उपयोग करतात ते जणूं काय पक्क फळ सोडून कच्चेंच खाण्याची अभिलाषा करतात.

कोणी माणूस जाणूनबुजून कामचुकारपणा करून हातांवर हात ठेवून बसेल तर ती खरोखरच त्याला फार शरमेची गोष्ट आहे.

आळसांत दारिद्र्याचा वास असतो, परंतु जो आळस करीत नाहीं त्याच्या प्रयत्नांत लक्ष्मी राहते.

ज्या वेळीं कोणतेंहि संकट तुमच्यावर कोसळेल त्या वेळीं हंतस हंसत त्याला तोंड द्या. कारण आपत्तींना तोंड देणारीं हास्याशिवाय कोणतीहि चांगली वस्तु नाहीं.

उत्साह ही एक अपूर्व शक्ति आहे. ज्यांच्यांत उत्साह नाहीं ते नुसते लाकडाचे पुतळे होत. फरक इतकाच कीं त्यांचें शरीर मानवाचें आहे.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ४६ वा.

मराठींत लिहा ।

ह्यांनी मला सांगितलें, तुम्ही तर फारच थोडें खाल्लें व मी तुम्हांला दोन वेळां खाण्याबद्दल सांगितलें होतें.

माझा दोष तुम्ही मनांत कां आणतां? तुम्ही माझा कित्येक वेळां अपमान केला आहे. मी तुम्हांला कधीं बोललों आहें काय?

मी तुम्हांला दोन वेळां सांगितलें होतें कीं, तुम्ही आपल्या घरांतून बाहेर पडूं नका. तरी तुम्ही मला न विचारतां कां गेलां?

तुम्ही आपल्या मुलांस शाळेंत घालीत नाहीं. त्यामुळें तीं मूर्ख राहतात. तुम्ही त्यांस शाळेंत घालीत जा.

मी तुम्हांला सांगितलें होतें कीं, तुम्ही आपल्या घरांतून बाहेर पडूं नका. तरी तुम्ही मला न विचारतां कां गेलां?

तुम्ही आपल्या मुलांस शाळेंत घालीत नाहीं. त्यामुळें तीं मूर्ख राहतात. तुम्ही त्यांस शाळेंत घालीत जा.

———*———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ ४७ वा

संकेत-लिपीमध्यें लिहा

चांगल्या दिवसांत मनुष्याचे शेंकडों मित्र असतात, परंतु जो संकटाचे वेळीं मदत देईल तोच खरा मित्र म्हणविला जातो.

विद्याधन कोणी चोर चोरूं शकत नाहीं, तें राजा लुबाडूं शकत नाहीं, भाऊबंध वांटणी करूं शकत नाहीं. म्हणून विद्येपेक्षां चांगलें कोणतेंहि धन नाहीं.

राजा फक्त आपल्या देशांतच पूजिला जातो, परंतु विद्वानाचा सर्व ठिकाणीं आदर होतो.

गुण व अवगुण संगतीनेंच मिळतात, ज्याप्रमाणें खडीसाखरेच्या अनुषंगानें वेळवाचे तुकडेहि साखरेच्याच भावानें विकले जातात.

जो माणूस महा पुरुष होण्याची इच्छा करितो त्यानें ह्या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे कीं जें काम स्वतः करूं शकतो तें दुसऱ्याकडून करवून घेऊं नये आणि जर करून घेतलें तर त्यास आपणहि मदत करावी.

विपत्कालीं धैर्य, प्रभुपणिं सहिष्णुत्व बरवें ।
सभे पांडित्याचा प्रसर, समरीं शौर्य मिरवे ॥
स्वकीर्तीच्या ठायीं प्रचुर रति, विद्या व्यसन जें ।
तयांचे हे स्वाभाविक गुण सहा सत्पुरुष जे ॥



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एल्. पी. जैन ह्यांची संकेत लिपी

हिन्दी प्रथम भाग	....	....	०-८-०
,, दुसरा भाग	....	....	१-४-०
,, तिसरा भाग	....	....	२-०-०
English Book I	...	...	1-12-0 or 1 s.
English Pocket Edition		...	1-8-0
(To be learnt after Book I)			or 2 s.
,, on imitation art paper		...	2-0-0
			or 3 s.
गुजराती प्रथम भाग	....	....	०-८-०
,, दुसरा भाग	....	....	१-४-०
मराठी प्रथम भाग	....	....	०-८-०
,, दुसरा भाग	....	....	१-४-०

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण:—

एल्. पी. जैन,

ब्यावर (अजमेर)

मुद्रक:— स. रा. सरदेसाई, बी.ए., एल्एल्.बी., नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत' छापखाना, ४१ बुधवार, पुणें २

प्रकाशक:—एल्. पूनमचंद जैन, ब्यावर (अजमेर).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar